महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे - ४११००५

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education,
Pune Divisional Board, Pune - 411005

DIVISIONAL	DIVISIONAL	FAX - 020 / 25536761
25536722	SECRETARY	E-MAIL sscboardpune@gmail.com
(OFF)	25536781 / 82 / 83 25536712	Website: www.sscboardpune.in

क्रमांक : पुविमं/शाखा अ /उ मा/गुणपत्रिका/ 346
पुणे :४११ ००५
दिनांक : २५/०५/२०१६

प्रति,

प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविद्यालय,
जिल्हा- पुणे / अहमदनगर /सोलापूर.

विषय -फेब्रुवारी-मार्च २०१६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका व संपादणूक अभिलेखाबाबत .....

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, फेब्रुवारी-मार्च २०१६ मध्ये संपन्न झालेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस आपले कनिष्ठ महाविद्यालयामार्फत प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका व त्याचबरोबर विद्यार्थ्यांची संपादणूक (विद्यार्थ्यांनी घेतलेले विषय व विषयात प्राप्त झालेले गुण इत्यादीची माहिती) कनिष्ठ महाविद्यालय रजिस्टरची प्रत (**COLLEGE REGISTER**) दिनांक ०३/०६/२०१६ रोजी निर्धारित वाटप केद्रावर पाठविण्यात येत आहे. कृपया सर्व गुणपत्रिका कनिष्ठ महाविद्यालयाच्या अभिलेखावरुन तपासून विद्यार्थ्यांचे नाव/आईचे नाव/माध्यम बदल/विषय बदल इ.दुरुस्ती असल्यास मूळ गुणपत्रक व दुरूस्ती नुसार दंड प्रत्येक विद्यार्थ्याप्रमाणे समक्ष मंडळ कार्यालयात जमा करावे.

(१) विद्यार्थ्यांचे नावात जनरल रजिस्टरप्रमाणे दुरुस्ती करण्यात येते. विद्यार्थ्यांचे नाव असलेल्या जनरल रजिस्टरच्या पृष्ठाची (पानाची) प्रमाणित केलेली छायांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

(२) विषयातील सूट दर्शवावयाची असल्यास मागील परीक्षेस सदर विषयात उत्तीर्ण झालेल्या गुणपत्रिकेची प्रमाणित केलेली छायांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

<u>उपरोक्त दुरुस्त्या निकालाचे तारखेपासून ३० दिवसाचे आत करुन घ्याव्यात.</u>

विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे : ४११ ००५.

markst_cand

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे - ४११ ००५.

क्रमांक : पुविमं/शाखा अ/प्रमाणपत्रे/
पुणे - ४११ ००५.
दिनांक : २५/०५/२०१५

अत्यंत महत्वाचे :

प्रति,

प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविद्यालय,
जिल्हा- पुणे / अहमदनगर /सोलापुर.

विषय : सप्टेंबर/ऑक्टो २०१५ मध्ये संपन्न झालेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र वाटपाबाबत....

उपरोक्त विषयाचे संदर्भात आपणास कळविण्यात येते की, आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत : सप्टेंबर/ऑक्टो २०१५ मध्ये संपन्न झालेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे दिनांक ०३/०६/२०१६ रोजी निर्धारित वाटप केंद्रावर पाठविण्यात येत असून, खालील सूचनेनुसार त्यावर कार्यवाही करावी.

१. प्रमाणपत्रे आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाचीच असल्याची खात्री करुन घ्यावी.

२. विद्यार्थ्यांचे नाव, बैठक क्रमांक, विषय, गुण इत्यादी माहिती आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाचे रजिस्टरवरुन तपासून पहावी. तद्नंतरच त्यावर प्राचार्यांनी स्वाक्षरी करावी व कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का मारावा व संबंधित विद्यार्थ्यास हस्तांतरित करावे.

३. विद्यार्थ्यांचे नावात जनरल रजिस्टरप्रमाणे दुरुस्ती असल्यास विद्यार्थ्यांचे नाव असलेल्या जनरल रजिस्टरच्या पृष्ठाची (पानाची) प्रमाणित केलेली छायांकित प्रत सादर करावी.

महत्वाचे ४. **प्रमाणपत्रात काही त्रुटी/दुरुस्ती असल्यास त्यासंदर्भात एक महिन्याचे आत या कार्यालयास मूळ प्रमाणपत्रासह व प्रत्येक विद्यार्थ्यास दुरूस्तीनुसार दंड रोख रक्कम अथवा चलनाने मंडळ कार्यालयात समक्ष सादर करावीत. मूळ प्रमाणपत्र पोस्टाव्दारे पाठविण्यात येऊ नये.**

① पुणे जिल्हा - विभागीय मंडळ, कार्यालय पुणे, पिंपरी, भोर, बारामती, नारायणगाव.

② अहमदनगर जिल्हा - अहमदनगर, कर्जत, संगमनेर, श्रीरामपुर

③ सोलापुर जिल्हा - सोलापुर, बार्शी, पंढरपुर

विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे - ४११ ००५.

FEB-MAR-OCT-2009 EXM STUD CERTI.